# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **नागपूर, दि. ४ ऑगस्ट २०१९**

# नामांतर लढ्यातील शहीद भीमसैनिकांना मनपातर्फे अभिवादन

**नागपूर, ता. १६ :** मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळावे या मागणीकरिता ४ ऑगस्ट १९७८ रोजी नामांतर आंदोलन झाले. या नामांतर आंदोलनात शहीद झालेल्या भीमसैनिकांना शहीद स्मृतिदिनानिमित्त रविवारी (ता. ४) नागपूर महानगरपालिकेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

कामठी मार्गावरील दहा नंबर पूल येथे असलेल्या नामांतर शहीद स्मारकावर उपमहापौर दीपराज पार्डीकर, आमदार डॉ. मिलिंद माने, मनपाच्या विधी समितीचे सभापती ॲड. धर्मपाल मेश्राम, दुर्बल घटक समितीचे सभापती गोपीचंद कुमरे, आसीनगर झोन सभापती विरंका भिवगडे, नगरसेविका मंगला लांजेवार, नगरसेवक महेंद्र धनविजय, संजय चावरे, शेषराव गोतमारे, निरंजना पाटील, नरेंद्र वालदे, किशोर जिचकार, यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून शहीद भीमसैनिकांच्ळा स्मृतीस श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी सर्वश्री अनिल वासनिक, राजकुमार वंजारी, अशोक कोल्हटकर, रमेश ढवळे, लहानु बनसोड, सुनील ढवळे, श्रीराम गजभिये, राजन टेंभुर्णे, अरुण गायकवाड, सुमेध हुमने, अशोक भेंडे, रामभाऊ डोंगरे, रवि सहारे, शैलेंद्र वासनिक, दिलीप गौर, जितेंद्र सोमकुंवर, अशोक मेंढे, अविनाश धमगाये, बबली मेश्राम, वैशाली साखरे व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.